कोळंबी लघु पाटबंधारे योजना
ता. यवतमाळ जि. यवतमाळ
योजनेस तृतीय सुधारीत प्रशासकीय
मान्यता प्रदान करणेबाबत.

(१)

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: ३०३ /विपाविम/कातं ३(१)/ (धा.क्र.११/२०१७)/ कोळंबी लपायो / तृतीय सुप्रमा / २०१९, दि. १९/०९/२०१९**

**संदर्भ :-**
१. शासन निर्णय क्र. लपात २२९८/(२२०/९८)/लपा २, दि. ०९.०७.१९९९.
२. शासन निर्णय क्र. लपात २२०५/(०९/०५)/लपा २, दि. २२.०९.२००५.
३. शासन निर्णय क्र. लपात २२०८/(५००/०८)/लपा २, दि. ०१.१२.२०११.
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
५. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/कोळंबी ल.पा.यो/ (धा.क्र.८७/२०१७)/८९/२०१९ दि. २३.०१.२०१९.
६. दि.३१.०१.१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(७५/२०१९)/लपा, दि. १५.०२.२०१९
७. विपाविम नियामक मंडळाचे दि. १२.०६.२०१९ रोजी संपन्न ७४ व्या बैठकीतील ठराव क्र. ७४/९

**प्रस्तावना :**

कोळंबी लघु पाटबंधारे योजना, ता.यवतमाळ , जि. यवतमाळ हा प्रकल्प गोदावरी खो-यातील पैनगंगा उपखो-यातील यवतमाळ तालुक्यात कोळंबी गावाजवळ स्थानिक नाल्यावर गावापासुन वरच्या बाजुस २.५ कि.मी. अंतरावर आहे. सदर प्रकल्पाद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ तालुक्यातील कोळंबी, कोरेगाव, पिंप्री (बुटी) व हातगाव या ४ गावातील २६३ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प आत्महत्याग्रस्त असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील आहे.

कोळंबी लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन १९९७-९८ चे दरसुचीवर आधारीत रू. २.४१ कोटी (रू. दोन कोटी एकेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. शासन निर्णय क्र.लपायो/२२०५/(०९/०५)/लपा-२ दि.२२.०९.२००५ अन्वये रु.५.२५ कोटी (रु. पाच कोटी पंचवीस लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००३-०४ वर आधारित) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. शासन निर्णय क्र.लपायो/२२०८/(५००/०८)/लपा-२ दि.०१.१२.२०११ अन्वये रु.८६६ लक्ष (रु. आठ कोटी सहासष्ठ लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००७-०८ वर आधारित) द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ,भुसंपादन खर्चातील वाढ, नविन बाबींच्या समावेशामुळे झालेली वाढ ,संकल्पनातील बदल, अपु-या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत द्वितिय प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

कोळंबी लघु पाटबंधारे योजनेचा तृतीय सुप्रमा प्रस्तावाबाबत महामंडळाने तयार केलेल्या छाननी अहवालाचा मुल्यार्पण (Vetting ) अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. ०६.१०.२०१८ रोजीच्या १२२ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ५ नुसार प्राप्त झालेला आहे.

कोळंबी लघु पाटबंधारे योजनेच्या तृतीय सुप्रमा प्रस्तावावर दि.३१.०१.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १२.०६.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७४ व्या बैठकीतील ठराव क्र. ७४/९ नुसार कोळंबी लघु पाटबंधारे योजनेच्या रू. १४.४७ कोटी अंदाजित किंमतीच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची द्वितीय प्रशासकीय मान्यता किंमत रू. ८.६६ कोटी च्या तुलनेत तृतीय सुप्रमा अहवालानुसार प्रकल्पाची किंमत रू. ५.८१ कोटी जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू (कोटी) | मंजुर द्वितीय सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे वाढ | ०.४८ | ५.५४ % |
| २ | कमी दराच्या निविदा स्विकृतीमुळे वाढ | (-)०.३८ | -४.३९ % |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ३.९१ | ४५.१५ % |
| ४ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ०.५२ | ६.००% |
| ५ | नविन बाबींचा समावेशामुळे झालेली वाढ | ०.८५ | ९.८२% |
| ५ | अपु-या तरतुदीमुळे वाढ | ०.६९ | ७.९७% |
| ६ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | ०.०१ | ०.१२ % |
| ७ | अनुषंगीक खर्च वाढ | (-)०.२७ | (-)३.१२ % |
| | एकूण | ५.८१ | ६७.०९ % |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये कोळंबी लघु पाटबंधारे योजना, ता. यवतमाळ, जि. यवतमाळ या योजनेच्या एकूण अंदाजीत किंमतीस रू. १४.४७ कोटी (रू. चौदा कोटी सत्तेचालीस लक्ष फक्त) तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. १३.६६(रू. तेरा कोटी सहासष्ठ लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ०.८१ कोटी (रू. एक्क्यांशी लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी —

**अ) योजनेचे सिंचन क्षेत्र - २६३ हेक्टर**

**ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा - १.८८ द.ल.घ.मी. (१८८०.०० स.घ.मी.)**

**क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत - रू. ७६,९६८ /-(मापदंड रू.१,२२,१३२)**

**ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर - १.०८ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)**

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता ( **२४** /२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे. वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मुल्यार्पन अवालात नमुद मुद्दा क्र. १ ते ६ मधील अभिप्रायाचे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५. सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

**मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य**

अधिक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
**नागपूर**

\\K13\d\k 3(1)\kolambi (से) 3rd सुप्रमा आदेश.doc

प्रत सहपत्रासह,

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, यवतमाळ.
१२. अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ.
१३. कार्यकारी अभियंता, यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग, यवतमाळ.
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती
१५. कातां ७, संग्रहार्थ.
१६. चित्र शाखा, संग्रहार्थ.

(५)

कोळंबी ल.पा. योजना प्रकल्प,
ता. यवतमाळ, जि. यवतमाळ
या योजनेस तृतीय सुधारित प्रशासकीय
मान्यता देण्याबाबत.

**महामंडळाचा निर्णय क्रमांक** :विपाविम/कातां.३(१)/(धा.क्र. ११/१७)/कोळंबी ल.पा.यो./२०१९
दिनांक :

**परिशिष्ट - १**
**कोळंबी ल.पा. योजना प्रकल्प,**
**ता. यवतमाळ जि. यवतमाळ**
**उप शिर्षवार तरतूदी**

किंमत रु.कोटी

| अ. क्र. | उपशीर्ष | रक्कम | | तरतूद एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| | | शिर्ष कामे | मुख्य कालवा | |
| १ | "अ" प्राथमिक कामे | ०.०३ | ०.०२ | ०.०५ |
| २ | "ब" भुसंपादन | ४.३९ | १.२१ | ५.६० |
| ३ | "सी" मुख्य कामे | ३.४० | ०.०० | ३.४० |
| ४ | "डी" विमोचक | ०.१७ | ०.०६ | ०.२३ |
| ५ | ई-प्रपात | ०.०० | ०.०५ | ०.०५ |
| ६ | "एफ"नाल्यावरिल पुल | ०.०० | १.०७ | १.०७ |
| ७ | "जी" रस्तावरिल पुल | ०.०० | ०.४६ | ०.४६ |
| ८ | "एच"निर्गमन | ०.०० | ०.१० | ०.१० |
| ९ | के-इमारती | ०.०२ | ०.०० | ०.०२ |
| १० | "एल"मातीकाम | ०.०० | २.२६ | २.२६ |
| ११ | "एम" वृक्षारोपण | ०.०१ | ०.०० | ०.०१ |
| १२ | "ओ" संकीर्ण | ०.०१ | ०.०२ | ०.०३ |
| १३ | "पी" देखभाल | ०.०६ | ०.०४ | ०.१० |
| १४ | "आर" दळणवळण | ०.२८ | ०.०० | ०.२८ |
| | एकूण कामाप्रित्यर्थ किंमत | **८.३७** | **५.२९** | **१३.६६** |
| | अनुषंगीक खर्च | **०.८१** | | **०.८१** |
| | योजनेची एकूण किंमत | | | **१४.४७** |

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

\\Sanjiv\d\vidc41\TECH - 18\KT-3(1)\SALOD dt. 06.03.19कोळंबी